दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३०५ ■ गुरूवार, दि. २७ फेब्रुवारी २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये

■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -305 ■ Thursday, 27 Feb 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## क्रौर्याचा कळस! २२ दिवसांच्या बाळाला भोंदूबाबाने विळा तापवून दिले चटके, श्वास घ्यायला त्रास होत असल्याने प्रकृती गंभीर

**चिखलदरा –** भूमकाने म्हणजेच एका भोंदू बाबाने या २२ दिवसांच्या बाळाला विळा तापवून ६५ वेळा चटके दिल्याची घटना घडली आहे. २२ दिवसांच्या बाळाला श्वास घ्यायला त्रास होत असल्याने त्याला विळा तापवून चटके दिल्याची घटना चिखलदरा तालुक्याकील सिमोरी गावात ही घटना घडली आहे. भूमकाने म्हणजेच एका भोंदू बाबाने या २२ दिवसांच्या बाळाला विळा तापवून ६५ वेळा चटके दिल्याची घटना घडली आहे.

नेमकं काय घडलं?

चिखलदरा तालुक्यातील सिमोरी गावातल्या २२ दिवसांच्या बाळाला श्वास घ्यायला त्रास होत होता. त्याला त्याच्या घरातल्यांनी गावातील भोंदूबाबाकडे नेलं. ज्याने या बाळाला विळा तापवून ६५ वेळा चटके दिले. या घटनेमुळे अतिदुर्गम अशा मेळघाटात अंधश्रद्धेचा कळस पाहण्यास मिळाला.या चटक्यांमुळे २२ दिवसीय बाळाची प्रकृती बिघडली. त्याला नातेवाईकांनी सिमोरी गावातून हातरु या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रात नेलं. मात्र त्याची प्रकृती बिघडली होती. त्यामुळे आता बाळाला अमरावतीतल्या जिल्हा स्त्री रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. सध्या या बाळावर अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयात उपचार सुरू आहे. बाळाला श्वास घ्यायला त्रास होत होता म्हणून बाळाच्या नातेवाईकाने भोंदू बाबाकडे नेऊन बाळाला गरम चटके दिले, बाळाच्या हृदयाला श्वास घ्यायला त्रास होतो, त्याची प्रकृती चिंताजनक आहे अशी माहिती डॉक्टरांनी दिली.

**अंनिसचे हरिष केदार यांनी काय म्हटलं आहे?**

सिमोरी गावातील बाळाच्या पोटावर ६५ वेळा चटके देण्यात आले आहेत. या प्रकाराला गावात डंभा असं म्हणतात. या अनिष्ट प्रथेविरोधात अंनिसने १०० गावांमध्ये आरोग्य विषयक कार्यक्रम राबवला होता. असे कार्यक्रम राबवण्याची आणखी राबवण्याची गरज आहे असं आम्ही शासनाला सांगितलं आहे. असं केदार यांनी म्हटलं आहे.

**बाळाचे वडील काय म्हणाले?**

बाळाला डंभा देण्यात आला कारण त्याला श्वास घ्यायला त्रास होत होता, असं मला कळलं. मी माझ्या कामांमध्ये होतो, बाळाला पोटावर चटके कुणी दिले मला माहीत नाही. भूमका वगैरे आला होता का ते मला माहीत नाही.

**बालरोग तज्ज्ञांनी बाळाच्या प्रकृतीबाबत काय सांगितलं?**

बाळ २२ दिवसांचं आहे. त्याला श्वास घ्यायला त्रास होतो आहे. त्याची प्रकृती नाजूक आहे. बाळाला हृदयाचा त्रास आहे असं दिसतं आहे. आम्ही टूडी इको चाचणी करण्याचा निर्णय घेतला आहे. गरज पडल्यास हायर सेंटरला बाळाला न्यावं लागेल. पोटावर चटके दिले आहेत कारण त्यांना वाटलं की बाळाला पोटाचा काहीतरी त्रास आहे. मात्र बाळाचं हृदय कमकुवत आहे.

वेळ पडल्यास बाळावर शस्त्रक्रियाही करावी लागू शकते. बाळाचे चटके आणि त्याचे वण काही दिवसांत बरे होतील. पण बाळाला श्वास घ्यायला त्रास होतो आहे. त्याच्यावर उपचार करण्याची गरज आहे. वेळ पडल्यास नागपूरलाही बाळाला न्यावं लागेल असं बालरोग तज्ज्ञांनी सांगितलं आहे. सध्या बाळाची प्रकृती गंभीर आहे.

## स्वयंपुनर्विकासात अडथळा आणल्यास नोकरीवर गदा!

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

स्वयंपुनर्विकासाला परवानगी देताना सरकारी यंत्रणेकडून येणारे अडथळे, गैरप्रकार खपवून घेतले जाणार नाहीत. यापूर्वी असे प्रकार निदर्शनास आल्यावर कठोर कारवाई केली होती. यापुढे स्वयंपुनर्विकासात कुणी खोडा घालायचा प्रयत्न केला, तर त्याला नोकरी वाचवणे कठीण होईल, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला.

कांदिवली पश्चिम येथील चारकोप श्वेतांबरा सहकारी गृहनिर्माण संस्थेचा स्वयंपुनर्विकास पूर्ण झाल्याने मुख्यमंत्र्यांच्या हस्ते रहिवाशांना नव्या घरांच्या चाव्यांचे वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल, स्थानिक आमदार योगेश सागर उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले की, स्वयंपुनर्विकासातून उभी राहिलेली ही पंधरावी इमारत आहे.

मुंबई बँक आणि प्रवीण दरेकर यांच्यामुळे स्वयंपुनर्विकास मोहिमेला चालना मिळाली. स्वयंपुनर्विकासाचा प्रवास २०१८ मध्ये आपण मुख्यमंत्री असताना सुरू झाला. आम्ही शासन निर्णय जारी केला. परंतु दुर्दैवाने २०१९ नंतर आपले सरकार नसल्यामुळे स्वयंपुनर्विकासाला खीळ बसली. आता वेगाने हे काम सुरू झाले असून गोरेगाव येथील गृहनिर्माण परिषदेत केलेल्या १८ मागण्यांपैकी १६ मागण्यांचे शासन निर्णय आम्ही जारी केले आहेत. स्वयंपुनर्विकासाबाबत असलेल्या सर्व सेवांचा समावेश सेवा हक्क कायद्यात करू, म्हाडाच्या भूखंडावरील स्वयंपुनर्विकासाच्या बाबतीत अधिमूल्य भरण्यास यापूर्वीच तीन वर्षांची मुदत दिली होती व त्यावर साडेआठ टक्के व्याज आकारले जात होते. आता पहिल्या तीन वर्षांसाठी हे व्याज माफ करू, अशी घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली.

**विकासकांच्या मक्तेदारीवर अंकुश**

स्वयंपुनर्विकासासाठी जे-जे मागितले ते मुख्यमंत्र्यांनी दिले. विकासक आणि स्वयंपुनर्विकास यात फरक आहे. विकासकाकडे जाऊन आम्ही स्वाभिमान गहाण ठेवू शकत नाही. स्वयंपुनर्विकासात 'आत्मनिर्भर' होता येते. विकासकांची मक्तेदारी आपल्याला नष्ट करायची आहे, असा दावा प्रवीण दरेकर यांनी यावेळी केला.

**आत्मनिर्भर मुंबईकर उभा करण्याचा संकल्प**

स्वयंपुनर्विकास आणि समूह पुनर्विकासात अजूनही अनेक अडचणी आहेत, याची कल्पना असून दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली उपाययोजना सुचवण्यासाठी शासनाकडून समिती स्थापन केली जाईल.

या समितीच्या शिफारशी आल्यानंतर नवीन गृहनिर्माण धोरणात समावेश केला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले. मराठी माणसांसाठी बोलणारे अनेक आहेत. पण आम्ही स्वयंपुनर्विकासातून आत्मनिर्भर मुंबईकर उभा करण्याचा संकल्प केला आहे.

मुंबईचे चित्र स्वयंपुनर्विकासच बदलू शकते, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

## 'श्री शिवाय नमस्तुभ्यं'च्या जयघोषाने वेरूळ नगरी दुमदुमली

### पोलिसांचा तगडा बंदोबस्त.अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार यांनी घेतला मंदिर परिसराचा सुरक्षा आढावा

**खुलताबाद**
**(अट्टल संकेत प्रतिनिधी)**

तालुक्यातील- महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर आज बुधवारी खुलताबाद तालुक्यातील श्री. क्षेत्र वेरूळ येथील बारावे ज्योतीलिंग असलेल्या श्री घृष्णेश्वराचे जवळ पास तीन लाख भाविकांनी जय भोलेच्या जयघोषात दर्शन घेतले.या महोत्सवाच्या पार्श्वभुमीवर पोलीस प्रशासनाने तगडा बंदोबस्त तैनात केला होता.श्री घृष्णेश्वर तिर्थक्षेत्राला महाशिवरात्रीला विशेष धार्मिक महत्व आहे. श्री क्षेत्र वेरूळ येथील बारावे व शेवटचे ज्योतीर्लिंग असलेल्या श्री घृष्णेश्वराच्या दर्शना करीता भाविक, ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने सहभागी झाले होते राज्यभरातून भाविक बारावे ज्योतिर्लिंग घृष्णेश्वर मंदिराच्या दर्शनासाठी आले होते. मंगळवारी मध्यरात्री भाविकांनी दर्शना करता लावलेल्या रांगा आज रात्री येणाऱ्या

उशीरापर्यंत कायम होत्या.दिवस भरात जवळ पास तीन लाख भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.महा शिवरात्रीच्या पर्वावर पहाटे मंत्रोच्चारात श्री.घृष्णेश्वरास महाभिषेक व महाआरती करण्यात आली.त्यानंतर दुपारी चार वाजेच्या सुमारास मुख्य मंदिरातून पालखी मिरवणुकीतुन भोलेनाथास पवित्र तिर्थकुंड येथे नेण्यात आले.त्याठिकाणी भोलेनाथास मंगलस्नान व महाभिषेक करण्यात आला. त्यानंतर पुन्हा पालखी मिरवणुक मुख्य मंदिराकडे रवाना झाली. मिरवणुकीत संस्थानचे अध्यक्ष योगेश टोपरे, कार्यकारी विश्वस्त संजय वैद्य. राजेंद्र कोशिके रवींद्र पुराणिक

विकी दांडगे.दीपक अग्निहोत्री मंगेश पैठणकर गणेश हजारी किरण काळे. देवस्थानाचे माजी अध्यक्ष सुनील जोशी. चंद्रशेखर शेवाळे.दीपक शुक्ला शशांक टोपरे. परेश पाठक डॉ, महेश अग्निहोत्री मंगेश पैठणकर गणेश हजारी किशोर काळे. गुरु बच्चन हजारी.माजी उपसभापती विजय भालेराव. अनिल आव्हाड वेरुळचे पोलीस पाटील रमेश ढेवरे.यांचे सह कार्यकारी विश्वस्त मंडळी व वेरूळ येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. वेरूळ येथील महाशिवरात्री निमित्त वेरुळ येथे भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाला.



वेगवेगळ्या ठिकाणी शिवमंदिरांमध्ये भक्तांनी दिवसभर दर्शनाचा लाभ घेतला.तसेच महा शिवरात्री निमित्त महादेव मंदिरामध्ये भक्तांनी सकाळ पासूनच क्षेत्र वेरूळ येथे बारावे ज्योतिर्लिंग श्री घृष्णेश्वर मंदिरांचे दर्शनासाठी लंबी लंबी रेंगा लागल्या होत्या लागले होते.

शिवरात्रीचा श्री घृष्णेश्वर मंदिर संस्थान तर्फे साबुदाणा खिचडी व शुद्ध पाणी असे भाविकांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून मंदिर परिसरात भव्य मंडप उभारण्यात आले होते विविध उपाययोजना करण्यात आल्या होत्या. यात्रेवर नजर ठेवण्यासाठी विविध ठिकाणी ३० सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले होते.

विशेष म्हणजे अप्पर पोलीस अधीक्षक सुनील लांजेवार यांनी श्री घृष्णेश्वर मंदिर परिसरात कोणतेही अनुचित प्रकार घडू नाही म्हणून खबरदारी. घेत होते. उपविभागिय पोलीस अधिकारी विजयकुमार ठाकुरवाड खुलताबाद पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांचे मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता..

भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. हर हर महादेवच्या गजरात भक्तांनी महादेवाची पूजा अर्चना केली.

## जालन्यात झालेल्या बिबट्याच्या हत्येप्रकरणी ३ जणांवर गुन्हा दाखल

जालना - जालन्यात झालेल्या बिबट्याच्या हत्येप्रकरणी ३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला. मंगळवारी अंबड तालुक्यातील भालगाव रोडवरील पुलाखाली मृतावस्थेत एक बिबट्या आढळून आला होता. अंबड - भालगाव येथील ग्रामस्थांनी बिबट्या मृतावस्थेत आढळल्याची माहिती वन विभागाला दिली होती. त्या माहितीवरून वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला होता. त्यानंतर आता याप्रकरणी ३ जणांवर वन्यजीव कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून बिबट्याची हत्या करणारे ३ आरोपी निष्पन्न झालेत. दरम्यान, आरोपींच्या शोधासाठी वन विभागाचे २ पथकाने रवाना करण्यात आल्याची माहिती वन परिक्षेत्र अधिकारी विजयकुमार दौंड यांनी दिली. अंबड ते भालगाव या रस्त्याच्या शंकर राजाराम भोजने यांच्या शेताजवळ सडलेल्या अवस्थेत आढळलेला बिबट्या व्हायरल व्हिडिओतला असल्याची कबुली वनविभागाने दिली. दोन दिवसापूर्वी जालन्यातील घनसावंगी कुंभारपिंपळगाव परिसरात अज्ञात लोकांनी बिबट्याला मारहांन केल्याचा प्रकार समोरं आला होता. त्या मारहानीचा व्हिडिओ समाजमाध्यमावर प्रसारित झाला होता. त्या चित्रफितीतील हा बिबट्या असल्याची माहिती वनविभागाने दिली. या प्रकरणी वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ अन्वये शिकार करणे, प्राण्याची तस्करी करणे, अवैध वाहतूक करणे या कलमानव्ये आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आलाय त्याची माहिती विजयकुमार दौंड, वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना यांनी बुधवारी (दि. २६) संध्याकाळी सहा वाजेच्या सुमारास जालना वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयात दिली..

## बांगलादेश भारताबरोबर चांगले संबंध ठेवण्याचा दावा करू शकत नाही - एस. जयशंकर

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

बांगलादेशात अल्पसंख्यांक हिंदू नागरिकांवर हल्ले होत असल्याचा मुद्दा चर्चेत आहे. यादरम्यान बांगलादेशच्या मोहम्मद यूनुस प्रशासनातील परराष्ट्र व्यवहार सल्लागार मोहम्मद तौहिद हुसेन सोमवारी बोलताना म्हणाले की, बांगलादेशने दोन्ही देशांमधील सन्मान आणि सामाईक हिताच्या आधारावर भारताबरोबरील संबंध मजबूत राखण्याची आपली वचनबद्धता पुन्हा एकदा स्पष्ट केली आहे.

तसेच त्यांनी बांगलादेशातील अल्पसंख्यांक समुदायाविरोधात होर्णाया हिंसाचाराच्या घटना या भारतासाठी चिंतेचा विषय असू शकत नाहीत असेही म्हटले आहे. भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी बांगलादेशात अल्पसंख्यांकावर होत असलेले हल्ले आणि यूनुस प्रशासनाने आपल्या अंतर्गत मुद्द्यांसाठी भारताला जबाबदार ठरवत केलेल्या आरोपांबद्दल चिंता व्यक्त केल्यानंतर हुसेन यांनी उत्तर देत हे वक्तव्य केले आहे.

बांगलादेशचे म्हणणे काय?

सरकारी वृत्तसंस्था बीएसएसने हुसेन यांच्या हवाल्याने सांगितले की, ङ्कबांगलादेश नक्कीच आपली भूमिका निश्चित करेल. मात्र याबरोबरच भारताला हे निश्चित करावे लागेल की त्यांना बांगलादेशबरोबर कोणत्या पद्धतीचे नाते हवे आहे. हा परस्परांमधील मुद्दा आहे आणि असे म्हणणे चुकीचे नाही,ङ्घ असे हुसेन म्हणाले. त्यांनी भारताबरोबर त्यांच्या संबंधाबद्दल बांगलादेशच्या भूमिकेवर भर दिला आणि सहकार्याच्या दृष्टीकोनाचे महत्त्व देखील अधोरेखित केले. ङ्कआम्हाला परस्पर समंजसपणावर आधारित संबंध हवे आहेत आणि आमच्या भूमिकेत कोणतीही अस्पष्टता नाही,ङ्घ असे हुसेन हे पत्रकारांशी बोलताना म्हणाले.

एस जयशंकर यांनी शनिवारी बांगलादेशातील अल्पसंख्याकांवर काही दिवसांपूर्वी झालेल्या हल्ल्यांबद्दल चिंता व्यक्त केली होती. अशा घटनांबद्दल ते म्हणाले की, या घटना भारताच्या विचारांना प्रभावित करतात. त्यांनी असाही सल्ला दिली ही ढाकाने नवी दिल्लीबरोबर आपल्या संबंधावर स्पष्ट निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. जयशंकर म्हणाले होते की, बांगलादेशात अल्पसंख्यांकावरील हल्ल्यांमध्ये झालेल्या वाढीने स्पष्टपणे आमच्या विचारांना प्रभावित केले आहे आणि हे असे काही आहे ज्यावर आपण बोलले पाहिजे, जे की आम्ही केले आहे. ते पुढे बोलताना म्हणाले की, दुसरी बाजू ही आहे की, त्यांचे स्वत:चे वेगळे राजकारण आहे, मात्र अखेर आपण शेजारी आहोत. त्यांना याबद्दल आपले मत तयार करावे लागेल की त्यांना आपल्याबरोबर (भारत) कसे संबंध ठेवायचे आहेत.ङ्घ पुढे बोलताना जयशंकर म्हणाले बांगलादेश भारताबरोबर चांगले संबंध ठेवण्याचा दावा करू शकत नाही, जेव्हा की ते त्यांच्या देशातील समस्यांसाठी नवी दिल्लीला जबाबदार ठरवत आहेत. ते म्हणाले की, ङ्कतुम्ही एकीकडे असे म्हणू शकत नाहीत की आम्हाला आता तुमच्याबरोबर चांगले संबंध ठेवण्याची इच्छा आहे, मात्र सकाळी जागे होतात आणि प्रत्येक चुकीच्या गोष्टीसाठी आम्हाला दोषी ठरवता. हा देखील असा एक निर्णय आहे जो त्यांनी घ्यायचा आहे.ङ्घ

मात्र हुसेन यांनी बांगलादेशातील अल्पसंख्यांकांवरील हल्ल्यांबद्दलची चिंता ही अंतर्गत बाब असल्याचे म्हटले आहे. तसेच ही भारतासाठी चिंतेची बाब नसावी असेही म्हटले आहे. ढाका ट्रिब्यूनने दिलेल्या वृत्तानुसार ते म्हणाले की, ङ्कबांगलादेशातील अल्पसंख्यांक हे बांगलादेशचा मुद्दा आहे, जसे की भारत त्यांच्या अल्पसंख्यांकांशी कसा व्यवहार करते हा भारताचा प्रश्न आहे.ङ्घ ते पुढे म्हणाले की, ङ्कम्हणून, मला वाटते की हस्तक्षेप न करण्याचे धोरण पाळले पाहिजे. आम्ही अल्पसंख्यांकांचा मुद्दा हाताळत आहोत. ते बांगलादेशाचे नागरिक आहे. त्यांच्याकडे माझ्याप्रमाणेच

# जिल्ह्यात 'ग्रामपंचायत तेथे सहकारी संस्था' अभियान राबवा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

## मार्चअखेर प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात संस्था कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

यंदाचे वर्ष हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष असल्याचे संयुक्त राष्ट्र संघाने घोषीत केले आहे. त्याअनुषंगाने जिल्ह्यात येत्या मार्च महिन्या अखेर ज्या ज्या ग्रामपंचायत क्षेत्रात सहकारी संस्था कार्यान्वित नाही तेथे संस्था कार्यान्वित करण्यात यावी. त्यासाठी जिल्ह्यात 'ग्राम पंचायत तेथे सहकारी संस्था' हे अभियान राबवावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज दिले.




जिल्हा सहकार विकास समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, क्षेत्रिय व्यवस्थापक सुरेश पटवेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, सहा. आयुक्त अन्न व औषध प्रशासन शा. ना. साळे, जिल्हा दुग्ध व्यवसाय अधिकारी मनिषा हराळ मोरे, जिल्हा दुध संघाचे व्यवस्थापकीय संचालक सुरेश महाडीया, सहा. मत्स्य व्यवसाय विकास अधिकारी अमोल शेळके, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अजय मोटे, विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था दुग्ध के.एम. शहा, सह निबंधक डॉ. ए.बी. काशीकर तसेच अन्य विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यात ६९२ सहकारी संस्था असून त्यात ३०५ संस्थाचे संगणकीकरण करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. या सर्व संस्थांना संगणक व सहसाहित्य पुरवठा करण्यात आला आहे. त्याच प्रमाणे १३३ सार्वजनिक सुविधा केंद्र सुरु करण्यात आले आहेत. संस्थाच्या गटसचिवांना प्रशिक्षणही देण्यात आले आहे. जिल्ह्यात सहकारी संस्थांमध्ये २ जनऔषधी केंद्र, ४ धान्य साठवण केंद्र इ. कार्यान्वित करण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाच्या निमित्त जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये सहकारी संस्था कार्यान्वित करण्याची प्रक्रिया सुरु करावी. ३१ मार्च पर्यंत ही प्रक्रिया आटोपली पाहिजे. ज्या ग्रामपंचायतीत संस्था नाहीत अशा ग्रामपंचायतींची यादी करुन प्रक्रिया सुरु करावी. त्याशिवाय जिल्ह्यात दुग्धोत्पादन, दुधावरील प्रक्रिया उद्योग या क्षेत्रात सहकारी संस्थांना चालना द्यावी. त्याच प्रमाणे पोल्ट्री, डेअरी या क्षेत्रालाही चालना देऊन त्यात सहकारी संस्थांचा सहभाग वाढवावा.संस्थांच्या बळकटीकरणासाठी उपक्रम राबवावे. याद्वारे ग्रामिण भागात रोजगार निर्मिती उपक्रमांना चालना द्यावी,असे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीत सहकार विभागांतर्गत येणाऱ्या केंद्रीय योजनांचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यात नवीन विविध कार्यकारी सेवा सोसायट्या स्थापन करणे, विविध कार्यकारी सेवा संस्थांनी नाविन्यपूर्ण व्यवसाय सुरु करणे. डेअरी, मत्स्य व्यवसाय, जनऔषधी केंद्र, धान्य गोदामे, खते-बि-बियाणे, पेट्रोल पंप इ. गोदाम बांधकामांसाठी प्रस्ताव तयार करणे, आपले सेवा केंद्र सारखे सेवा केंद्र सुरु करणे. धान्य खरेदी केंद्र सुरु करता यावे यासाठी विविध तांत्रिक बाबींची पूर्तता करणे अशा विविध विषयांबाबत आढावा घेण्यात आला. तसेच जिल्ह्यात सहकारी संस्थांमार्फत करता येण्यासारख्या मत्स्य व्यवसाय, दूध संकलन केंद्र, दाळ प्रक्रिया व्यवसाय अशा विविध व्यवसायांच्या अनुषंगाने आढावा घेण्यात आला. तसेच सहकारी संस्थांचे संगणकीकरण करुन त्यांचे अद्यावतीकरण करण्याबाबतही आढावा घेण्यात आला.

# प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना; देशात महाराष्ट्र आणि राज्यात छत्रपती संभाजीनगर प्रथम

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

प्रधानमंत्री सुक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत सर्वाधिक २२ हजार १० प्रकल्पांना मंजूरी महाराष्ट्रात देण्यात आली तर छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात १८९५ प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे. महाराष्ट्रात हा उच्चांक आहे.

राज्य नोडल अधिकारी कृषी संचालक (कृषी प्रक्रिया व न्नियोजन) कृषी आयुक्तालय विनयकुमार आवटे यांच्या कार्यालयाकडून ही आकडेवारी प्राप्त झाली आहे. प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेअंतर्गत राज्यात २२०१० प्रकल्पांना मंजूरी देण्यात आली आहे. यातील सर्वाधिक प्रकल्प १८९५ हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आहे.अशाप्रकारे छत्रपती संभाजीनगर जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे. त्या खालोखाल अहिल्यानगर, सांगली, नाशिक आणि पुणे अशी क्रमवारी आहे.

**अशी आहे योजना**

शेतकऱ्यांना शेतीसह जोडधंदा अथवा गावात, लहान खेड्यात करता येण्यासारख्या व्यवसायांकरीता कृषी व अन्न प्रक्रिया उद्योग हा उत्तम पर्याय आहे. त्यामुळे शेतकरी व सामान्य नागरिकांचे जीवनमान सुधारु शकते. यासाठी प्रधानमंत्री सुक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना राबविली जाते.

ग्रमिण व शहरी भागातील लाभार्थी या योजनेत सहभागी होऊ शकतात व तसा त्यांचा प्रतिसादही योजनेला लाभत आहे. विशेष म्हणजे वैयक्तिक, गट लाभार्थी ही या योजनेचा लाभ घेऊ शकतात. सामाईक पायाभुत सुविधा, इनक्युबेशन सेंटर, मूल्य साखळी, स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्यांना बीज भांडवल, मार्केटींग, ब्रॅण्डींग अशा घटकांकरीता अर्थसहाय्य या योजनेतून दिले जाते. बीज भांडवल घटकांपर्यंत गटांच्या सदस्यांना जास्तीत जास्त ४० हजार रुपये प्रति सदस्य तर ४ लाख रुपये प्रति गट याप्रमाणे अर्थ सहाय्य दिले जाते. प्रक्ल्प खर्चाच्या ५० टक्के रक्कम मार्केटींग व ब्रँडींगसाठी दिली जाते. या योजनेतील लाभार्थ्यांना जिल्हास्तरावर मोफत प्रशिक्षण दिले जाते. आतापर्यंत राज्यात २९ हजार १८३ जणांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. हा सुद्धा देशात उच्चांक आहे.




**२२६३ कोटी रुपयांची गुंतवणूक**

द्धदेशात सर्वाधिक प्रकल्प म्हणजेच २२०१० महाराष्ट्राने मंजूर केले आहेत. द्वितीय क्रमांक बिहार तर तिसऱ्या क्रमांकावर उत्तर प्रदेश ही राज्ये आहेत. याचा परिणाम म्हणून राज्यात २२६३ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून ३८९ कोटी रुपयांचे अनुदानही लाभार्थ्यांना देण्यात आले आहे.

**मंजूर प्रकल्प (प्रक्रियानिहाय)**

राज्यात मंजूर झालेल्या २२०२२ प्रकल्पांमध्ये तृणधान्य उत्पादने-४३६९, मसाले उत्पादन ३५२२, भाजीपाला उत्पादने ३२४२, कडधान्य उत्पादने २७३३, फळ उत्पादने-२१६०, दुग्ध उत्पादने-२०९९, तेलबिया उत्पादने-८३०, पशुखाद्य उत्पादने-५५३, तृणधान्य उत्पादने-५२३, उस उत्पादने-४४६, मांस उत्पादने-१२०, वन उत्पादने-९८, लोणचे उत्पादने-४१, सागरी उत्पादने-३९ इतर १३१२ या प्रमाणे प्रकल्प मंजूर झाले आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आतापर्यंत १८९५ प्रकल्प मंजूर असून त्यातील ७०२ छत्रपती संभाजीनगर तालुक्यात, १३२ पैठण, ४५१ फुलंब्री, ८८ वैजापूर, १२८ गंगापूर, ३०५ खुलताबाद, ५४ सिल्लोड, २२ कन्नड, १३ सोयगाव प्रकल्पांचा समावेश आहे. मुळ उद्दिष्टाच्या ११३.१९ टक्के उद्दिष्ट साध्य झाले आहे. या प्रकल्पांमध्ये प्रामुख्याने आवळा उत्पादने-१, पशुखाद्य-३, बेकरी उत्पादने-५, काजू उत्पादने-२, दाळ प्रक्रिया-४, मत्स्य व्यवसाय-१, पिठाची गिरणी-३, फळ प्रक्रिया-१, आले लसून पावडर-२, जिरासोडा-१, गुळ उत्पादन-२,मसूर डाळ उत्पादने-१, लिंबू आधारीत उत्पादने-१, मका प्रक्रिया-८२, मसाले प्रक्रिया-३८, दुग्ध उत्पादने-३६, तृणधान्य प्रक्रिया-७, तेल प्रक्रिया -१२, कांदा निर्जलिकरण-६०३, टोमॅटो निर्जलिकरण-४३७, भाजीपाला निर्जलिकरण-५१२, बटाटा चिप्स उत्पादने-४, स्नॅक्स-७, डाळी उत्पादने-११, गहू उत्पादने-१९, सोयाबीन उत्पादने-१, मसाले उत्पादने-३३ अशी एकूण १८९५ प्रकल्प जिल्ह्यात आहेत. त्यात २१ कोटी ३३ लक्ष २३ हजार रुपये इतकी गुंतवणूक झाली आहे, अशी माहिती कृषी विभागाने दिली आहे.

**मोफत मार्गदर्शन सुविधा**

प्रकल्प अहवाल तयार करणे, ते बँकेकडे सादर करणे, उद्यम इ. बाबतच्या नोंदणी करणे इ. साठी कृषी विभागामार्फत जिल्हास्तरावरुन संसाधन व्यक्ती मार्फत मोफत मार्गदर्शन केले जाते.

**ऑनलाईन अर्ज सुविधा**

इच्छुक अर्जदार अर्थात वैयक्तिक लाभार्थी, गट लाभार्थी वा सामाईक पायाभुत सुविधा या घटकांना ु.िषाश.ेषळि.र्सी.ळप या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येतो.

बीज भांडवल योजनेचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्यांनी ग्रामिण भागासाठी www.nrlm.gov.in तर शहरी भागासाठी www.nulm.gov.in या संकेतस्थळांवर अर्ज करावा. अधिक माहितीसाठी नजिकचे कृषी कार्यालये, बँका, जिल्हा संसाधन व्यक्ती यांच्याशी संपर्क साधावा.

# ग्रामसामाजिक परिवर्तन अभियानांतर्गत झालेल्या कामांची पाहणी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

शाश्वत सामुदायिक विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान राबविण्यात येत आहे. याअंतर्गत जिल्ह्यात खाम नदी पुनरुज्जीवनासह आरोग्य, जलसंधारण व विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. या प्रकल्पांना नुकतेच (दि.१८) प्रवीण अग्रवाल यांनी भेट देऊन पाहणी केली.

यावेळी त्यांनी पर्यावरणीय स्थिरता, सुलभ आरोग्यसेवा आणि धोरणात्मक भागीदारी आणि नाविन्यपूर्ण उपायांमुळे भविष्य-सज्ज शिक्षण वाढवण्याची बांधिलकी अधोरेखित केली. स्टरलाइट टेक्नॉलॉजीज लिमिटेड (एसटीएल) चे उपाध्यक्ष अग्रवाल यांनी छत्रपती संभाजीनगर येथील प्रमुख सामाजिक उत्तरदायित्व निधीतून होत असलेल्या उपक्रमांना भेट दिली. यात खाम नदी संवर्धन प्रकल्पाची पाहणी त्यांनी केली. टोणगाव येथे आरोग्य सेवा उपक्रम, मोबाइल आरोग्य युनिट्स आणि प्रतिबंधात्मक वैद्यकीय हस्तक्षेपसेवा, टेलिमेडिसिन आणि जलद निदानांचा लाभ देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कुंभेफळ रोबोटेक्स इंडियाच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेल्या रोबोएज कार्यक्रमाला त्यांनी भेट दिली. एआय, कोडिंग आणि रोबोटिक्स तंत्रज्ञानाधारित प्रशिक्षण दिले जाते. या उपक्रमांनी जिल्ह्यात परिवर्तन घडवून आणले आहे. पर्यावरण संवर्धनात, उपक्रमांमुळे ४ लाखांहून अधिक वृक्षारोपण झाले आहे, ९५ हून अधिक जल संरचनांची निर्मिती झाली आहे आणि २.६९ दशलक्ष घनमीटर पाण्याची बचत झाली आहे, ज्यामुळे ५६ गावांतील लोकांना फायदा झाला आहे.

आरोग्यसेवेत, स्वास्थ्य सुरक्षा कार्यक्रमामुळे २.५ दशलक्षाहून अधिक लोकांवर परिणाम झाला आहे, ज्याममध्ये ४८% महिला लाभार्थी आहेत.

आजारपणात २९% घट झाली आहे आणि ७०% रुग्णांना मोफत औषधे मिळाली आहेत. शिक्षणामध्ये, एसटीएलने ३०० सरकारी शाळांवर परिणाम केला आहे, ज्यामुळे लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना फायदा झाला आहे, तर रोबोएज कार्यक्रमात ११शाळांमधील ५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला आहे, ज्यापैकी १३ विद्यार्थ्यांनी एस्टोनियामधील रोबोटिक्स आंतरराष्ट्रीय चॅम्पियनशिपमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले,अशी माहिती यावेळी देण्यात आली.



राष्ट्रवादी युवक काँग्रेस सोशल मीडिया परभणी जिल्हाध्यक्ष शाहेद भैय्या सिद्दीकी यांचे वाढदिवसाच्या निमित्त आपंग विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व बिस्कीट वाटप करण्यात आले. यावेळी क्राईम इन्वेस्टिगेशन ब्यूरो के डायरेक्ट फराह मैडम, वासेफ सिद्दीकी साहब,एम ग्रुप अध्यक्ष इब्राहीम भाई, राजू लाला, सदीक सर, शे अयान, अनीस देशमुख, शेख शाहेद,मुसेफ खान व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा शुक्रवार २८ रोजी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

कौशल्य,रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मध्यवर्ती बसस्टँड रोड, मालजीपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे शुक्रवार दि.२८ रोजी सकाळी साडे नऊ वाजता आयोजीत करण्यात आला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील नामांकीत कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहून मुलाखती घेणार आहेत. या रोजगार मेळाव्यामध्ये रत्नप्रभा मोटर्स, नवभारत फर्टीलायझर्स लि, एक्सेल प्लेसमेंट, एलीगंट कोटिंग्स प्रा.लि., संजिव ऑटो पार्ट प्रा.लि, सवेरा फार्मासिटीकल प्रा.लि., एन आर बी बेअरींग लि., इंडूरंन्स टेक्नॉलॉजी ली., सुदर्शन सौर शक्ती प्रा.लि., भुवन व्हील्स प्रा. ली. (सोहम ऑटो), औरंगाबाद ऑटो ॲन्सीलरी प्रा.ली., बी जी ली -ईन ईलेक्ट्रीकल लि., फोर्ब्स प्रेसीशन टूल्स ॲण्ड मशिन पार्ट्स, ग्रीव्हज कॉटन प्रा.लि. टि के प्रीसीशियन प्रा.लि. इत्यादी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील नामांकित नियोक्त्यांचे प्रतिनिधी ६०३ वेगवेगळ्या रिक्तपदांकरीता मुलाखती घेतील. यासाठी कोणत्याही शाखेची पदवी, इंजिनीअरींग, डिप्लोमा, आय टी आय, एच एस सी, एस एस सी उतीर्ण इत्यादी पात्रताधारक उमेदवारांना विविध शैक्षणिक व व्यावसायीक पात्रतेनुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

सहभागी होण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे आणि मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदासाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. दि.२८ रोजी सकाळी साडे नऊ वाजता कार्यक्रमस्थळी उपस्थित राहून पात्रतेप्रमाणे विविध नियोक्त्यांकडे मुलाखती देवून रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# पाणी टंचाईः प्रत्यक्ष पाहणी करुन प्रस्ताव सादर करावा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

उन्हाळा कालावधी जवळ येत असतांना काही गावांमधून पाणी टंचाईची माहिती मिळत आहे. तेव्हा तहसिलदार, तलाठी, ग्रामसेवक यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन टंचाई नियोजनासाठी प्रस्ताव पाठवावा, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले. जिल्ह्यात उन्हाळ्याच्या पार्श्वभुमिवर आज जिल्हाधिकारी यांनी आढावा घेतला. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी दुरदृष्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते. तर जिल्हा मुख्यालयातून निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा खनिकर्म अधिकारी किशोर घोडके सहभागी झाले होते. पाणीटंचाईचे नियोजन करण्यासाठी प्रत्येक तलाठी, ग्रामसेवक यांनी तातडीने भेट देऊन पाहणी करावी. पाण्याची उपलब्धता, त्याचे स्रोत, मिळणाऱ्या पाण्याची गुणवत्ता इ.बाबत पाहणी करावी. त्यानुसार आठ दिवस आधी प्रस्ताव पाठवावा. याच कालावधीत पाणी बचतीसंदर्भात जनजागृतीही करावी. या सोबतच रोजगार हमी योजना, आरोग्य सेवा इ. बाबत नियोजन करावे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात एक सौर ग्राम तयार करावयाचे असल्याने त्यासाठी प्रत्येक तालुक्यातून एका गावाची पाहणी करुन निवड करावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

# खिर्डी ग्रामपंचायतीत सत्ता परिवर्तन! कृष्णा दवंडे पुन्हा सरपंच पदावर विराजमान



**खुलताबाद (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील खिर्डी ग्रामपंचायतीत मोठे राजकीय नाट्य घडले आहे. सरपंच ज्ञानेश्वर मातकर यांचे सरपंच पद विभागीय आयुक्तांनी रद्द केल्या नंतर उपसरपंच कृष्णा दवंडे यांनी पुन्हा सरपंच पदाची धुरा सांभाळली आहे. सुनील घुसळे यांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने विविध आरोपांची चौकशी झाली होती. त्यानंतर मातकर यांचे पद रद्द करण्यात आले. या राजकीय उलथापालथीत उपसरपंच असलेले कृष्णा दवंडे पुन्हा सरपंच पदावर विराजमान झाले आहेत.दवंडे यांच्या सत्कार समारंभात माजी सरपंच कृष्णा चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य आकाश हिवर्डे,साईनाथ मातकर संतोष जेठे, चांद शेख, लक्ष्मण वरकड, राजू हिवर्डे,व वेरूळचे सामाजिक कार्यकर्ते अनिल आव्हाड यांची उपस्थिती होती.

खिर्डी ग्रामस्थांमध्ये या सत्ता परिवर्तनामुळे नवा उत्साह वातावरण असून, आगामी काळात. शासनाच्या विविध नव्या योजना राबवले जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# छत्रपती शिवरायांचा इतिहास हा लोककल्याणाचा इतिहास आहे - डॉ.शिवानंद भानुसे यांचे प्रतिपादन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

छत्रपती शिवरायांच आयुष्य हा व्यक्ती ते विश्वासाठी एक दीपस्तंभ आहे. आरसा आहे. पारदर्शक असा वारसा आहे. त्यांनी विविध क्षेत्रात मनंदड निर्माण केले. छत्रपती शिवरायांचा इतिहास हा केवळ ढाल तलवारींचा इतिहास नसून लोककल्याणाचा व परिवर्तनाचा इतिहास आहे. असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक, शिवव्याख्याते डॉ.शिवानंद भानुसे यांनी देवगिरी महाविद्यालयात २५ फेब्रुवारी रोजी केले. ते शिवजयंती निमित्त आयोजित विशेष व्याख्यानात बोलत होते.

डॉ.शिवानंद भानुसे पुढे म्हणाले की, छत्रपती शिवरायांनी स्वराज्य स्थापन केले. त्यामागे त्यांचे वडील शहाजीराजे व जिजाऊमाता यांची प्रेरणा होती.शिवरायांचा लढा हा कोणत्याही व्यक्तिगत लाभासाठी नव्हता. सर्व मानवी अधिकार नाकारलेल्या जनतेला सन्मानाने जगता यावे यासाठी स्वराज्य पाहिजे होते. त्यामुळे रयतेच्या मानसिकतेत बदल करून, महाराजांनी राजकीय, धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रातील मक्तेदारी व गुलामगिरी मोडून काढली. समता स्थापित केली. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज मध्ययुगीन जागतिक इतिहासातील पहिले एकमेव मानवतावादी योद्धा, शासक, प्रशासक, शिक्षणतज्ञ, मानसशास्त्रज्ञ भाषाशास्त्रज्ञ, उत्कृष्ट अभियंता होते. जागतिक पातळीवर राजेशाही असताना लोकशाहीची पहिल्यांदा अंमलबजावणी शिवरायांनी केली. आरमारा उभारले, छापखाना काढला. रयतवारी पद्धती सुरू केली. त्यामुळेच रयत त्यांना कुळवाडी भूषण, लोककल्याणकारी राजा मानत होती. महाराष्ट्र शासनाने सर्व विद्वान इतिहास संशोधक, विचारवंत विविध क्षेत्रातील मान्यवर यांची समिती नेमून अधिकृत शिवचरित्र व महापुरुषांची चरित्र लिहिले पाहिजेत. यामुळे इतिहासाचे विकृतीकरण व वाद होणार नाही. छत्रपती शिवरायांचा आदर्श घेऊन आज आपण सर्वांनीच वाटचाल केली पाहिजे. असे डॉ.शिवानंद भानुसे म्हणाले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर यांनी शिवरायांचा परिवर्तनाचा इतिहास सांगितला व जगभर शिवजयंती व्हायची असेल तर तारखेनुसारच व्हावी. अशी अपेक्षा व्यक्त करून, महाराणी येसूबाई व ताराराणी यांच्या इतिहासावर प्रकाश टाकून त्यांचं स्वराज्य टिकवणे व वाढवणे यासाठीचे योगदान सांगितले. व खरा इतिहास जनतेसमोर यावा अशी अपेक्षा व्यक्त केली. विचारपीठावर प्राचार्य डॉ.अशोक तेजनकर, उपप्राचार्य डॉ. गणेश मोहिते, डॉ.रवी पाटील, श्रीमती डॉ. अपर्णा तावरे, प्रा.एन. जी.गायकवाड,प्रा.सुरेश लिपाने, प्रा. विजय नलावडे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अनंत कणगरे यांनी केले. तर या कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तुळजाभवानीच्या शिखराला मिळणार सोन्याची झळाळी, सिमेंटचे नवे आवरण हटणार, शिखराचे प्राचीन रूप सहा महिन्यात पुन्हा साकारणार

## तुळजाभवानी मंदिर समितीचे विश्वस्त तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती

धाराशिव : पुरातत्व खात्याने केलेल्या तुळजाभवानी मंदिराच्या स्ट्रक्चरल ऑडिटचा अहवाल प्राप्त झाला आहे. कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिराचे प्राचीन शिखर चुना आणि जुन्या विटांपासून तयार करण्यात आलेले आहे. त्यावर नंतरच्या काळात अडीच फूट जाडीचे नवे सिमेंट काँक्रीटचे व दगडांचे आवरण दिल्यामुळे वजन वाढले आहे. परिणामी मंदिराचे शिखर ज्या तुळईवर उभे आहे त्याच्या चार पैकी दोन दगडी शिळांना तडे गेले असल्याचा निष्कर्ष पुरातत्व विभागाने नमूद केला आहे. त्यामुळे संपूर्ण शिखर उकलून पुन्हा उभारले जाणार आहे. प्राचीन काळी ज्या प्रकारचे शिखर होते तसे मूळ शिखर साकारून त्याला सोन्याने मढविण्यात येणार असल्याची माहिती तुळजाभवानी मंदिर समितीचे विश्वस्त तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. पुरातत्व खात्याने सादर केलेल्या स्ट्रक्चरल ऑडिटच्या अहवालानुसार तुळजाभवानी देवी मंदिराच्या मूळ इमारतीवर सिमेंट काँक्रीट आणि दगडांचा अतिरिक्त बोजा पडला आहे. चुना आणि विटांपासून साकारण्यात आलेल्या प्राचीन शिखरावर अडीच फूट जाडीचे नवे सिमेंट काँक्रीटचे आवरण आहे. त्यामुळे जगदंबेच्या गाभाऱ्यातील तुळईच्या चार पैकी २ दगडी शिळांना तडे गेले आहेत असे स्पष्ट निरीक्षण नोंदवण्यात आले असल्याने मंदिराच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे सर्व काढून पुरातन पद्धतीने परंतु पुन्हा नव्याने करणे आवश्यक आहे हे पुरातत्व विभागाचेच मत असल्यामुळे याबाबत कोणीही गैरसमज निर्माण करू नयेत असे आवाहन आ.पाटील यांनी केले आहे.

### सहा महिन्यांच्या आत शिखर पूर्ण होणार

साडेतीन शक्तिपीठांपैकी एक पूर्ण पीठ असलेल्या कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या मंदिराचे शिखर अधिकाधिक सहा महिन्यांच्या आत पूर्ण होईल असा विश्वास पुरातत्व विभागाने व्यक्त केला आहे. सध्याच्या अहवालावरून मंदिराच्या भिंती काढण्याची आवश्यकता भासत नाही. मात्र काम करताना त्याकडे बारकाईने लक्ष ठेवले जाईल आणि आवश्यकता भासल्यासच भिंती काढल्या जातील असेही पुरातत्व विभागाने म्हटले असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

पुरातत्व खात्याने संरचनात्मक लेखापरिक्षण अहवालच्या (स्ट्रक्चरल ऑडिट) आधारे जे निष्कर्ष काढले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत. यामध्ये त्यांनी इमंदिर बांधकाम हे दगडामध्ये असले तरी मुळ मंदिराच्या बांधकामध्ये वारंवार बदल करण्यात आल्याचे दिसून येत असल्याचे म्हटले आहे. त्यामुळे मंदिरामध्ये मोठ्या प्रमाणात संरचनात्मक बदल झालेला आहे. सध्या मंदिरामध्ये शिखराचा अतिरिक्त भार झाला असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शिखराची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच तुळजाभवानी मातेचे मंदिर हे भूकंप क्षेत्र ४ च्या आणि किल्लारीच्या भूकंप प्लांट झोनच्या ८० कि.मी.च्या आत असल्याने मंदिराच्या गर्भगृहाचे व शिखराचे काम करणे आवश्यक असल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. एकंदरीत संरचनात्मक लेखापरिक्षण अहवाल बघता मुख्य मंदिराच्या गर्भगृहाचे व शिखराचे काम करणे आवश्यक असून पुढील योग्य कार्यवाहीस्तव हा अहवाल सविनय सादर करीत असल्याचा सुस्पष्ट निष्कर्षही पुरातत्व खात्याने काढला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले. मंदिर समितीच्या स्वउत्पन्नातुन मंदिर जीर्णोद्धाराचे काम हाती घेण्यात आले आहे. गाभाऱ्यातील टाईल्स हटवून मूळ रूपातील दगडी गाभारा भविकांसमोर मांडण्यात येणार आहे. टाईल्स हटवण्याचे काम सुरू असताना गाभाऱ्यातील दगडी शिळांना तडे गेल्याचे निदर्शनास आले. या कामाच्या निमित्ताने ही बाब लक्षात आल्यामुळे भविष्यातील दुर्घटना टाळता आली आहे. त्यावर शास्त्रीय आणि अचूक पद्धतीने काम करण्यासाठी पुरातत्त्व खात्याच्या माध्यमातून स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची शिफारस केली होती. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनीही आपण केलेल्या शिफारशीनुसार तात्काळ कारवाईचे निर्देश पुरातत्व विभागाला दिले होते. तोच अहवाल आता प्राप्त झाला असून मंदिराच्या शिखरावर सिमेंट काँक्रीटच्या अतिरिक्त वजनामुळे गाभाऱ्यातील शिळांना तडे गेल्याचा निष्कर्ष अहवालामुळे स्पष्ट झाले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

श्री तुळजाभवानी मंदिर शेकडो वर्ष जुने आहे. मंदिरामध्ये असलेले दगडी खांब, भिंती, मंदिराचे छत तसेच मंदिराचे शिखर आणि कळस या सर्व भागांची तपासणी शास्त्रोक्त पद्धतीने भारतीय पुरातत्व विभागाच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आली. आपल्या पुढील अनेक पिढ्यांना या मंदिरामधील प्राचीनता, मूळ कलाकुसर पाहता यावी आणि मूळ रूपातील कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी आणि मंदिराचे समाधानकारक दर्शन मिळावे यासाठीच पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून श्री तुळजाभवानी मंदिराचे प्राचीन रूप जतन करण्याचा प्रयत्न आहे. मंदिराची मूळ रचना कशा पद्धतीची आहे ? याची वस्तुनिष्ठ माहिती पुरातत्व खात्याने सादर केलेल्या अहवालाच्या निमित्ताने समोर आली आहे. आता त्याचा आधार घेऊन श्री तुळजाभवानी मंदिराचे प्राचीन स्वरूप जपण्यासाठी सर्वसमावेशक काम सुरू करणे गरजेचे आहे. भविष्यकाळातही तुळजाभवानी देवीचे मंदिर चिरंतन राहावे यासाठी पुरातत्त्व विभागाच्या माध्यमातून श्री तुळजाभवानी मंदिराचे मूळ रूप जतन करण्याचा आपला प्रयत्न आहे. मंदिराच्या पावित्र्याला आणि मूळ पुरातन स्वरूपाला कोणताही धक्का न लावता हे काम केले जाणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे. तुळजाभवानी मातेचे शिखर सोन्याने मढविण्यात येणार आहे. देशातील सुवर्ण मंदिर, अक्षरधाम मंदिर, तिरुपती मंदिर, शिर्डीचे साई मंदिर आदी मंदिरांची शिखरे सोन्याने मढलेली आहेत. त्याच धरतीवर हा निर्णय घेण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक, स्थानिक व्यापारी आणि पुजारी बांधव आशा सर्वांचे सहकार्य महत्त्वाचे असणार आहे. याबाबत कोणाला काही सुचवावे वाटत असेल अथवा काही शंका असतील तर त्यांनी मंदिर समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी यांच्याकडे लिखित स्वरूपात आपले म्हणणे सादर करावे असे आवाहनही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

# सिडको जैन मंदिरात आचार्य विद्यासागर महाराजांच्या चरण चिन्हाची स्थापना

## महाराजांच्या पहिल्या चरण चिन्हाचा मान शहराला



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

आचार्य विद्यासागरजी महाराज यांच्या प्रथम समाधी दिवसानिमित्त त्यांच्या चरण चिन्हाची स्थापना करण्याचा मान सिडकोतील कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाल दिगंबर जैन मंदिराला मिळाला आहे. या शेकडो भाविकांच्या साक्षीने चरण चिन्हाची विधिवत स्थापना रविवारी करण्यात आली.

कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाल दिगंबर जैन मंदिर एम २ सिडकोचा वार्षिक यात्रा महोत्सव व आचार्य विद्यासागरजी महाराजांचा प्रथम समाधी महोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी मंदिरात प्रमोद डेरे यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण करण्यात आले. यानंतर

पार्श्वनाथ चौक येथील किर्ती स्तंभ येथे माजी नगरसेवक नितीन चित्ते व ज्योती पिंजरकर यांच्या हस्ते धर्मध्वजारोहण करण्यात आले. या चौकातून वाजतगाजत शोभायात्रा काढण्यात आली. मंदिरात प्रदिप शिगरे परीवार वतीने मंगलकलश स्थापना करून भगवंतांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. संगीतमय कल्याण विधान व ६४ रिद्धी विधान झाले. प्रतिष्ठाचार्य राजेश रोकडे व संगीतकार मनोज पाटील हे होते. मंदिराच्या वरच्या मजल्यावर बांधण्यात आलेल्या संगमरवरी मंदिरात आचार्यजींच्या पादुका चिन्हाची स्थापना अध्यक्ष दिगंबर क्षीरसागर परिवाराने केली.रथ सारथी मान विजया कोळपकर याना मिळाला महोत्सव यशस्वितेसाठी सचिव अमोल मोगले तसेच विलास जोगी, नीलेश सावळकर, दिगंबर वायकोस, प्रकाश भाकरे, वर्धमान वायकोस, शेखर वायकोस, बाहुबली धोंगडे, संदीप वायकोस, सविता गोसवी, विलास जोगी आदींनी परिश्रम घेतले.

**१०८ किलोंचे चरण चिन्ह**

छत्तीसगड येथील चंद्रगिरी तीर्थ येथे आचार्य विद्यासागरजी महाराज यांनी समाधी घेतली. तिथे भव्य स्मारक बनविण्यात येणार आहे. तिथेच आचार्यजींच्या १०८ चरणचिन्ह बनविण्यात आले. हे अष्टधातूंचे १०० किलो वजनाचे चरणचिन्ह संपूर्ण देशातील दिगंबर जैन मंदिरात स्थापनेसाठी पाठविण्यात येणार आहे. या पादुका चिन्ह स्थापनेचा महाराष्ट्रात पहिला मान सिडकोतील कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाल दिगंबर जैन मंदिराला मिळाला आहे.

# 'भडकल गेट येथील भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १०० फुट उंचीचा पुतळा १४ एप्रिल २०२५ पर्यंत अभिवादनासाठी तयार करावा'



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

भडकल गेट येथील भारतरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची उंची १०० फुट उंचीचा व १४ एप्रिल २०२५ पर्यंत अभिवादनासाठी तयार करणेबाबत मा. विभागीय आयुक्त साहेब, विभागीय कार्यालय छत्रपती संभाजीनगर औरंगाबाद यांना निवेदन देण्यात आले. सेक्युलर रिपब्लिकन फेडरेशन ऑफ इंडिया सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ दिपक खिल्लारे सर यांच्या मार्गदर्शनाखाली व संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष पँथर अशोक भाई गायकवाड व जिल्हा महासचिव पँथर किशोर ससाणे हे येत्या १० मार्च २०२५ रोजी आमरण उपोषणाला बसणार आहे. मा कार्यकारी अभियंता साहेब, सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाबांधकाममध्ये होत असलेल्या दिरंगाई, निवेदन, व चळवळीतील कार्यकर्त्यांची दिशाभूल करत आहेत तरी या विषयांना घेऊन आमरण उपोषणाला पँथर अशोक भाई गायकवाड व पँथर किशोर ससाणे बसणार आहे. यावेळी डॉ दिपक खिल्लारे संस्थापक अध्यक्ष तथा राष्ट्रीय अध्यक्ष, प्रदेश कार्याध्यक्ष अशोक गायकवाड, प्रमोद थोरात प्रदेश उपाध्यक्ष, किशोर ससाणे जिल्हा महासचिव, अनिल जाधव जिल्हा सचिव, मिलिंद जाधव जिल्हा सदस्य, मायाबाई केदारे ग्रामीण जिल्हाध्यक्षा, शशिकलाबाई थोरात, दगडाबाई जमधडे, कांताबाई केदारे, झुंबरबाई जाधव, जिजाबाई केदारे, चंद्रकलाबाई केदारे , सखुबाई केदारे, पंडित बाई, यांच्या सह्या आहेत.

**अन्यथा, अशोक भाई गायकवाड व किशोर ससाणे हे येत्या १० मार्च २०२५ रोजी आमरण उपोषणाला बसणार आहे**

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • **RNI No. MAHMAR/2023/87816**